**सरकारतर्फे सा.क्र.४**

**शपथेवर**

नांव : डॉ. परमेश्वर बाबासाहेब घोळवे ,
वय : ३७ वर्षे , धंदा : डॉक्टर,
राहणार : ग्रामीण रूग्णालय नेवासा , ता.- नेवासा,
जि. अहिल्यानगर

**सरतपास सरकार पक्षातर्फे विद्वान सरकारी वकिल श्रीमती एस. पी. औताडे यांचेमार्फत शपथेवर सुरु** -

१. माझे शिक्षण एम.बी.बी.एस. आणि एम.डी. झालेले आहे. दि. १४/११/२०२२ रोजी मी ग्रामीण रूग्णालय नेवासा फाटा येथे कार्यरत होतो. दि. १४/११/२०२२ रोजी शिवाजी घुले व भाउसाहेब घुले हे रूग्णालयात तपासणीसाठी आले होते. तपासणी करण्यापुर्वी दोघांनीही त्यांना दि.१४/११/२०२२ रोजी सकाळी १०.३० वा. मारहाण झाल्याचे सांगितले होते. प्रथम मी शिवाजी सारंधर घुले यांना १२.३५ मि. तपासले होते. शिवाजी घुले यांना पहिली जखम खरचटने (ॲब्रेजन) उजव्या कोप-यावर २ × २ से.मी. चे खरचटलेले होते. त्या जखमेचे वय फ्रेश आणि ती सिंपल इंज्युरी होती. दुसरी जखम खरचटने ॲब्रेजन ओव्हर फोर आर्म, साईज १ × १ से.मी. फ्रेश आणि सिंपल. तिसरी जखम खरचटने वरच्या ओठावर, फ्रेश व सिंपल होती. चौथी जखम ब्लंट ट्रोमा लोअर बॅक त्याचे वय फ्रेश आणि नेचर सिंपल होते. आता मला शिवाजी घुले यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र दाखविण्यात आले. हे तेच प्रमाणपत्र आहे जे मी शिवाजी घुले यांना तपासल्यानंतर दिले होते. त्यावर माझी सही व शिक्का आहे. सदर प्रमाणपत्र माझ्या हस्ताक्षरात आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर प्रमाणपत्रास **निशाणी ५८** देण्यात येते. शिवाजी घुले यांना झालेल्या जखमा या टणक हत्याराने म्हणजेच काठी किंवा दगडासारख्या हत्याराने होउ शकतात.

२. त्यानंतर मी भाउसाहेब सारंधर घुले यांना तपासले होते. त्यांना पहिली जखम कंन्टयुजन लॅसरेटेड वुन्ड ओव्हर परायटल रिजन झाली होती. त्या जखमेची साईज २ × ०.१ × ०.१ से.मी. होती. त्या जखमेचे वय फ्रेश आणि नेचर सिंपल होते. दुसरी जखम ॲब्रेजन ओव्हर राईट नॉस्ट्रील, त्याची साईज १ × ०.३ से.मी.त्या जखमेचे वय फ्रेश आणि नेचर सिंपल होते. तिसरी जखम ब्लंन्ट ट्रोमा ओव्हर लेफ्ट एल्बो, त्या जखमेचे

वय फ्रेश आणि नेचर सिंपल होते. भाउसाहेब घुले यांना झालेल्या जखमा या कठीण व टणक हत्यांमुळे होउ शकतात. कठीण व टणक हत्यांरामध्ये काठी, दगड येउ शकतात. तपासणी नंतर मी त्यांना प्रमाणपत्र दिले होते. ते प्रमाणपत्र आता मला दाखविण्यात आले. त्यावर माझी सही व शिक्का आहे. सदर प्रमाणपत्र माझ्या हस्ताक्षरात आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ५९** देण्यात येते.

**<u>सरतपास पुर्ण</u>.**

**<u>आरोपीतर्फे विद्वान वकिल श्री. आर. बी. गव्हाणे यांचे मार्फत उलटतपास सुरू.</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, माणसाच्या पाठीमागच्या वरील बाजुस पाठ आणि खालील बाजुस कंबर म्हणतात. हे म्हणणे खरे आहे की, लोअर बॅक म्हणजे कंबर.हे म्हणणे खरे आहे की, भाउसाहेब घुले यांना दिलेल्या वैद्यकीय प्रमाणप (निशाणी ५९) क्र. २ ची जखम ही काडीने देखील होउ शकते.हे म्हणणे खरे नाही की, जखम क्र. २ छोटी असल्यामुळे ती काठीने होउ शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, जखमेचे वय फ्रेश म्हणजे मारहाण होण्यापुर्वी अर्धा ते एक तासातील असते.एखाद्या रूग्णाला तपासायला साधारण ५ ते १० मि. लागतात. एक रूग्ण तपासल्यानंतर मी दुसरा रूग्ण तपासला. हे म्हणणे खरे आहे की, नि. ५८ व ५९ वरील प्रमाणपत्रावरील वेळ एक सारखीच आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि. क्र. ५८ व ५९ वरील नमुद जखमा मोटारसायकलवरून पडल्यामुळे होउ शकतात. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र. ५८ व ५९ वरील नमुद जखमा हया संबंधीत रूग्णांना झाल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी ५८ व ५९ वरील प्रमाणपत्रे मी खोटी दिली होती.

**न्यायालयीन प्रश्न :** निशाणी क्र. ५८ च ५९ वरील प्रमाणपत्रावरील उजव्या कोप-यावरील पहिली नमुद केलेली वेळ ही तुम्ही रूग्णांना तपासण्याची वेळ आहे की, रूग्णांना प्रमाणपत्र देतानाची वेळ नमुद केलेली आहे.

**साक्षीदाराचे उत्तर:** रूग्ण एकत्र आल्यानंतर केस पेपर एकदा काढले जातात. त्यावेळी ती वेळ नमुद केली जाते.

४. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी ५८ वर चौथ्या लाईनवर नमुद केलेले ‘‘ चेकड बाय.... ॲट.....’’ मध्ये नमुद केलेली वेळ ही रूग्ण तपासणीची वेळ आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.५८ वरील वैद्यकीय प्रमाणपत्रावरील तिस-या ओळीतील नमुद केलेले

‘‘ ब्रॉट बाय.....ॲट.....’’ ही वेळ रूग्णाला पोलीसांनी पाठविलेली वेळ आहे. हे म्हणणे खरे आहे की, वरील नमुद दोन्ही वेळ या सारख्याच आहेत. हे म्हणणे खरे आहे की, रूग्ण तपासणीकरीता आला असता त्याचे केस पेपर बनविण्यासाठी एका व्यक्तीला पाच ते दहा मि. वेळ लागतो. केस पेपर बनवल्यानंतर डॉक्टरांना भेटण्यासाठी लागणारी वेळ ही त्या त्या दिवशीच्या परिस्थतीनुसार वेगवेगळी असते. ती वेगवेगळी वेळ म्हणजे कधी कधी दहा मि., वीस मि. व आणखी कमीही असु शकते. हे म्हणणे खरे आहे की, नि. ५८ व ५९ वरील वैद्यकीय प्रमाणपत्र मी एकाच वेळी बनवल्यामुळे मी एकच वेळ टाकली आहे. हे म्हणणे खरे नाही की, दोन्ही प्रमाणपत्र ही बनावट असल्यामुळे त्यावर एकच वेळ नमुद केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि. ५८ व ५९ वरील नमुद जखमा या इतर ब-याच कारणामुळे होउ शकतात केवळ काठी व दगड मारहाणीमुळे होउ शकतात असे नाही.हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

..........................
**(वैद्यकीय अधिकारी)**

दिनांक : ०४/०२/२०२६.

**श्रवणोत्तर स्विकृती**
स्वाक्षरीत/-
(लीना अ. काळे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र. ४, नेवासा.